**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी**
**<u>योजनेंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना</u>**
**शासकीय यंत्रणांना ग्रामपंचायतीप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत व नेमणुकीची कार्यपध्दती**

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४९ /रोहयो-१०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ५ जून,२०१०

संदर्भ : १) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००६/ प्र.क्र.१०४/ रोहयो-१०, दिनांक १९ ऑक्टोबर, २००६.
२) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००६/ प्र.क्र.१०४/ रोहयो-१०, दिनांक २३ जानेवारी. २००८.
३) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक : मग्रारोहयो-२००८/प्र.क्र.३/रोहयो-१०, दिनांक ५ जून, २००८.
४) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००६/ प्र.क्र.१०४/ रोहयो-१०, दिनांक २७ मे, २००९.

**<u>प्रस्तावना :-</u>**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी कमीत कमी ५०% कामे ग्रामपंचायतीमार्फत करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे, ५०% पर्यंतची कामे शासकीय यंत्रणा करू शकेल अशी तरतूद योजनेमध्ये आहे. ग्रामपंचायतीमार्फत योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक ग्रामपंचायतीमागे एक ग्राम रोजगार सेवक आणि दहा ग्रामपंचायतीमागे एक तांत्रिक पॅनेल नेमण्याची तरतूद संदर्भाधीन दिनांक १९ ऑक्टोबर,२००६ च्या आदेशानुसार करण्यात आली आहे.

२. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना अधिनियम २००५ अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत सुधारणा करणे, तसेच सदर योजना राज्यात प्रभावीपणे राबविणे, केंद्रीय निधीचा पर्याप्त वापर करणे, सध्याच्या व्यवस्थेतील दोष दूर करणे व आवश्यक असल्यास

धोरणात्मक बदल करणे, त्याबाबत सूचना करण्याकरीता शासन निर्णय क्रमांक उपसमिती २०१०/ प्र.क्र.२५/रोहयो-६, दिनांक ४ मार्च २०१० च्या आदेशान्वये मंत्रिमंडळाची उप समिती गठीत करण्यात आली होती. उपसमितीने शासकीय यंत्रणांना ग्रामपंचायतीप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी शिफारस केली होती. ही शिफारस मंत्रिमंडळाने मान्य केली आहे.

३. या व्यतिरिक्त उपसमितीने अशीही शिफारस केली होती की, कामांना प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता देण्याच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्यात यावे. सध्या मग्रारोहयो अंतर्गत कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. तसेच तांत्रिक मंजूरी देण्याचे अधिकार त्या त्या विभागाच्या जिल्हा, उप विभागीय आणि तालुका स्तरावरील तांत्रिक अधिका-यांना आहेत. मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार प्रशासकीय मान्यतेचे पूर्ण अधिकार आता तहसिलदार व गट विकास अधिकारी आणि तांत्रिक मान्यतेचे अधिकार ग्रामपंचायतीच्या कामाकरिता पंचायत समितीच्या अभियंत्यास व यंत्रणाच्या कामाकरिता संबंधित खात्याच्या तांत्रिक तालुका स्तरावर अधिकाऱ्यास स्वतंत्र आदेशाद्वारे देण्यात येत आहेत.

गट विकास अधिकारी आणि तहसिल कार्यालयाला आणि यंत्रणांना देण्यात आलेली नवीन जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांच्याकडेही काही प्रमाणात अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

४. शासकीय यंत्रणांना ग्रामपंचायतीसारखे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत त्याचप्रमाणे गट विकास अधिकारी/तहसिल कार्यालयासाठी अतिरिक्त मनुष्यबळ खालीलप्रमाणे उपलब्ध करून देण्याबाबत शासन आता पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**<u>शासन निर्णय</u>**

**(१) <u>शासकीय यंत्रणांना ग्रामपंचायतीप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत</u> :**

१.१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काही जिल्हयांमध्ये मोठया प्रमाणात मजुरांची मागणी येत आहे आणि काही जिल्हयात मजुरांची मागणी पूर्वीच्या रोजगार हमी

योजनेच्या अंमलबजावणीपासून फार कमी आहे. उदा. नंदूरबार, नांदेड, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, इ. क्षेत्रात पूर्वीपासून आणि आताही मागणी येत आहे. दुसऱ्या बाजूला कोल्हापूर, सोलापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पुणे, इ. क्षेत्रात पूर्वीही मागणी फार कमी होती आणि आताही मागणी कमी आहे. या कारणांमुळे यंत्रणांना लागणारे मनुष्यबळ प्रत्येक जिल्हयामध्ये आणि जिल्हयांतर्गत प्रत्येक तालुक्यामध्ये वेगवेगळी मागणी रहाणार आहे.

१.२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वार्षिक आराखडा तयार करण्याचे अधिकार ग्रामसभा यांना देण्यात आले आहेत. ग्रामसभा दरवर्षी पुढच्या वर्षी मजुरांची मागणी कितपत येणार आहे आणि त्या मागणीची पूर्तता करण्यासाठी कोणकोणती कामे घ्यावी लागणार आहेत याचा आराखडा तयार करीत असतात. या आराखडयाला पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेची मान्यता लागते. हा आराखडा तयार करतेवेळी कोणती कामे ग्रामपंचायतीमार्फत घेण्यात येणार आहेत आणि कोणती कामे शासकीय यंत्रणामार्फत घेण्यात येणार आहेत याची निश्चिती केली जाते.

१.३) शासकीय यंत्रणांना मनुष्यबळ पुरविण्यामध्ये वरील दोन बाबी अंतर्भूत केल्या आहेत आणि या दोन बाबींवर किती प्रमाणात मनुष्यबळ द्यावयाचे हे ठरविणे आवश्यक आहे. हे ठरविण्यासाठी वर्षाच्या सुरूवातीस जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे गठीत केलेली समिती त्याप्रमाणे निर्णय घेईल.

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक | अध्यक्ष |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक | सह अध्यक्ष |
| ३) | उप संचालक, सामाजिक वनीकरण | सदस्य |
| ४) | उप वन संरक्षक | सदस्य |
| ५) | कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, स्थानिक स्तर | सदस्य |
| ६) | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हापरिषद | सदस्य |
| ७) | जिल्हा कृषि अधिकारी | सदस्य |
| ८) | उप जिल्हाधिकारी (रोहयो) | सदस्य सचिव |

१.४) यामध्ये ग्राम रोजगार सेवकासारखे योजना सहाय्यक आणि कोणत्या यंत्रणांना तांत्रिक (तांत्रिक पॅनेल) मनुष्यबळ द्यावयाचे याबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती ठरवेल.

१.५) त्याचप्रमाणे, गट विकास अधिकारी आणि तहसिल कार्यालयासाठी अतिरिक्त किती मनुष्यबळ लागेल तेही जिल्हाधिकाऱ्यांची समिती ठरवेल.

१.६) दरम्यान यापेक्षा अतिरिक्त मनुष्यबळाची (ग्राम रोजगार सेवक, तांत्रिक पॅनेल इ.) आवश्यकता भासल्यास यंत्रणेच्या जिल्हास्तरीय अधिका-यांनी स्वतंत्र प्रस्ताव तयार करुन जिल्हाधिका-यांच्या समितीपुढे सादर करावा. त्यानुसार अतिरिक्त मनुष्यबळ किती लागेल ते जिल्हाधिका-यांची समिती ठरवेल.

१.७) ज्या तालुक्यामध्ये कमी काम असेल अशा दोन ते तीन तालुक्यांना मिळून मनुष्यबळ पुरविता येऊ शकेल. त्याबाबतचा निर्णय जिल्हाधिका-यांची समिती घेईल.

**(२) <u>शासकीय यंत्रणा/गट विकास अधिकारी /तहसिल कार्यालयात मनुष्यबळ नेमणुकीची कार्यपध्दती :</u>**

२.१) कंत्राटी पध्द्तीने मनुष्यबळ नियुक्त करताना खालीलप्रमाणे कार्यपध्द्ती राहील.

(१) शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना प्राधान्यक्रम राहील

(२) ५० वर्षावरील व्यक्तीस अग्रक्रम दुसरा राहील.

(३) वरील दोन्ही पध्द्तीने मनुष्यबळ उपलब्ध झाले नाही तर मनुष्यबळ पुरविणा-या खाजगी एजन्सीमार्फत कंत्राटी पध्द्तीने नियुक्ती करावी.

(४) ग्राम रोजगार सेवक व तांत्रिक पॅनेलचे काम कंत्राट पध्दतीवर एकत्रितपणे कोणत्याही स्वयंसेवी संस्थेस नेमून देता येऊ शकेल.

या व्यतिरिक्त इतर कोणत्याही पध्द्तीने नियुक्ती करण्यात येऊ नये. ही नेमणूक करण्यासाठी आवश्यकतेनुसार जिल्हाधिकारी, संबंधित शासकीय यंत्रणा, गटविकास अधिकारी, तहसिल कार्यालये यांचेकडून त्यांना लागणाऱ्या मनुष्यबळाची माहिती घ्यावी आणि ही माहिती घेतल्यानंतर वर्तमानपत्रात

जाहिरात द्यावी. जाहिरातीमध्ये आलेले अर्ज पात्रतेप्रमाणे असतील तर त्याची छाननी करून १ पॅनेल तयार करावे. या पॅनेलमधून मागणीप्रमाणे शासकीय यंत्रणा/गट विकास अधिकारी/तहसिल कार्यालये यांना मनुष्यबळ पुरविणे, दिलेल्या प्रमाणाप्रमाणे मनुष्यबळ कंत्राटी पध्द्तीने नेमावेत.

२.२) पॅनेलमधील मनुष्यबळाचा पुरवठा कमी झाला तर त्यावेळेस पॅनेलची क्षमता वाढविण्यासाठी पुन्हा जिल्हाधिकारी जाहिरात देऊन पॅनेल आवश्यकतेनुसार वाढवू शकतील.

२.३) शासकीय यंत्रणांनी पॅनेलमधून नेमलेल्या व्यक्तीस जर कमी करावयाचे असेल तर ज्या व्यक्तींना सर्वप्रथम नेमले आहे त्यांना पहिले कमी करावे.

२.४) तसेच कुठल्याही प्रकारची कायमस्वरुपी आस्थापना अथवा कायमस्वरुपी जबाबदारी शासनावर पडणार नाही यांची खबरदारी कार्यान्वयन यंत्रणांनी (ग्रामपंचायतीसह) काटेकोरपणे घेणे आवश्यक राहील.

सदर आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २२८/१०/व्यय-८, दि.३ जून,२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१००६०५१४१०४६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( बा.बा.नारायणकर )
उप सचिव (रोहयो)

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
५) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
७) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
८) सर्व विभागीय आयुक्त.
९) मुख्य अभियंता व सह सचिव (रोहयो)
१०) वित्त विभाग /व्यय ८ शाखा, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
११) सर्व जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी.
१२) सर्व सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद.
१३) सर्व विशेष कार्यकारी अधिकारी व उप विकास आयुक्त (रोहयो).
१४) सर्व उप जिल्हाधिकारी (रोहयो).
१५) उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, रोहयो समिती, महाराष्ट्र विधानमंडळ, विधान भवन, मुंबई.
१६) सर्व उपसचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग)
१७) कक्ष अधिकारी, रोहयो -१, सारसंग्रह
१८) निवडनस्ती, रोहयो-१०.

*********************